नियमित फौजदारी खटला क्रमांक २२७/२०१७

नि.नं. ६४/क

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. २</u>

माझे नांव – जसविंदरसिंग जोरासिंग गिल

वय वर्षे - ३६ व्यवसाय – हॉटेल व्यवसाय

रा. वाठार, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.

<u>शपथेवर साक्षीदाराचा सरतपास सरकार तर्फे डी डी देशमुख, सरकारी वकील यांचे तर्फे सुरु,</u>

१. सन २०१७ मध्ये वाठार येथे शेर ए पंजाब हॉटेल चालवित होतो. सन २०१७ मध्ये धाब्यावर/हॉटेलमध्ये काही घटना घडली होती हे मला आता आठवत नाही. आरोपींनी सन २०१७ मध्ये हॉटेलमध्ये येवुन दंगा केला, हाणामारी केली असे काही घडले नाही. माझे समक्ष आरोपींनी लाकडी फळी, बिअरच्या बाटलीने कोणाला मारहाण केली होती असे काही घडले नाही. मी आरोपीनां ओळखत नाही.

<u>(सदरचा साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या जबाबा व्यतिरिक्त कथन करु लागल्याने, सहा सरकारी अभियोग्ता यांच्या मौखिक विनंती नुसार सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी अभियोग पक्षास देण्यात येत आहे.)</u>

२. दि. १०-०३-२०१७ रोजी आरोपी व फिर्यादी आमच्या धाब्यावर जेवायला आले होते किंवा कसे हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला माझे समक्ष तुला मस्ती आली

आहे असे म्हणत लाथा बुक्याने मारहाण केली व तुला सोडणार नाही अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सागर ठाकर याने माझे समक्ष बिअरची बाटली फिर्यादी सौरभ गायकवाड याच्या डोक्यात मारली व आरोपी अक्षय याने लाकडी फळीने फिर्यादीच्या पाठीत मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. आता साक्षीदारास त्याच्या दि. १२-०३-२०१७ रोजीच्या जबाबातील रेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमुद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपी क्र. १ व २ करीता ॲड आर डी जुगळे यांचे तर्फे सुरु,</u>

उलटतपास नाकारला .

<u>उलटतपास आरोपी क्र. ३ ते ५ करीता ॲड आर आर पाटील यांचे तर्फे सुरु,</u>

उलटतपास नाकारला .

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

दि. ०५/०५/२०२६. श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

( एस ए कुलकर्णी )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव.